# साय फाय करंडक स्पर्धेत 'वाट' एकांकिका प्रथम

पुणे, दि. २४ (प्रतिनिधी) - क्विक हिल टेक्नॉलॉजिजच्या क्विक हिल फौंडेशनतर्फे आयोजित केलेल्या साय फाय करंडक एकांकिका स्पर्धेत प्रारंभ संस्थेच्या 'वाट' या एकांकिकेने प्रथम पारितोषिक मिळविले, तर 'फोर्थ डायमेन्शन' आणि 'मिशन परफेक्शन' यांना अनुक्रमे दुसरे व तिसरे पारितोषिक मिळाले.

अभिनेत्री पर्ण पेठे, अभिनेते सुयश टिळक, दिग्दर्शक गिरीश जोशी आणि सुनील सुकथनकर यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले. आयटी सुरक्षा उपायाचे अग्रगण्य पुरवठादार क्विक हिल टेक्नॉलॉजिज



लिमिटेडची सीएसआर शाखा असलेल्या क्विक हिल फौंडेशनने पुणे पोलिसांच्या सहकार्याने साय-फाय करंडक स्पर्धा आयोजित केली होती. क्विक हिल टेक्नॉलॉजिज लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कैलाश काटकर, क्विक हिल टेक्नॉलॉजिज लिमिटेडचे सह व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य तंत्रज्ञान अधिकारी संजय काटकर आदी यावेळी उपस्थित होते.

भोपू या एकांकिकेचे लेखक शरद दुबे यांना लेखनाबद्दल प्रथम, तर सबजेक्टचे लेखक भूषण पाटील यांना द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले. 'आयडिज' या एकांकिकेसाठी अभिजित झुंजारराव यांना दिग्र्शनासाठी प्रथम पारितोषिक मिळाले, तर दिग्दर्शनाचा द्वितीय पारितोषिक फोर्थ डायमेन्शनसाठी प्रियदर्शिनी इंदालकर यांना मिळाले. अभिनयाचा प्रथम पुरस्कार तुषार कोळेकर यांना, तर महिला गटात सोनाली मगर यांना प्रथम पारितोषिक मिळाले. यावेळी कैलास काटकर यांनी क्विक हिल टेक्नॉलॉजिजची माहिती दिली.